Greenlawns School , Worli

सहामाही परीक्षा (प्रथम-सत्र २०२४-२५)

इयत्ता - आठवी | पूर्णांक - ८०

दिनांक - ४/१०/२०२४ | विषय- मराठी | वेळ - २ तास

सूचना:- सगळे प्रश्न अनिवार्य आहेत.

शुद्ध भाषा व सुवाच्य लेखन अपेक्षित आहे.

विभाग - अ

भाषा - विभाग (अंक - ४० )

प्रश्न १] खालीलपैकी एका विषयावर निबंध लिहा:- (१०)

i) फाटक्या पुस्तकाची आत्मकथा

ii) वृक्षारोपणाचे महत्त्व

iii) आमची सहल

प्रश्न २] खालील विषयावर पत्र लिहा:- (७)

सोनल / सोनाली शाह,१५, शाह सदन, पटेल मार्ग, औरंगाबाद येथून - श्री मुख्याध्यापक महात्मा गांधी प्रशाला, पटेल मार्ग, औरंगाबाद यांना पत्र लिहून आठ दिवसांची रजा मंजूर व्हावी यासाठी विनंती पत्र लिहितो / लिहिते.

प्रश्न ३] खालील उतारा वाचून विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा :-

मानवाची प्रगतिशील होण्याची त्याची धडपड आणि आजपर्यंत त्याची झालेली प्रगती हे लक्षांत घेता त्याची प्रवाहित राहण्याची क्षमता लक्षात येते. प्रथा, परंपरा, संस्कृती, लोकजीवन, कृषिकर्म, त्यासाठी लागणारी सामग्री हे सारेच लोकजीवनातून प्रतिबिंबित होताना दिसते. ग्रामीण लोकमानसाची समूहाने साधन निर्मिती करण्याची परंपरा संपूर्ण गावासाठी फलदायी असायची. 'साकव' हा लोकमानसाच्या अशाच साधन परंपरेचा एक महत्त्वपूर्ण भाग दोन गावांना, कधी कधी दोन वाड्यांना जोडणारा तो दुवा ठरायचा.

पावसाळ्यात नदी-नाले दुथडी भरून वाहायचे, कधी कधी तर सतत पाऊस कोसळत राहिल्याने साधा ओहोळ ओलांडून दुसऱ्या वाड्यावरही जात येत नसे. अशा प्रसंगी पावसाळ्यात नदी, ओहोळ पार करण्यासाठी एकच माध्यम, तेही साकवाचे. 'साकव' तयार करण्यासाठी सिमेंट कॉंक्रीटची गरज नसते तर त्यासाठी निव्वळ नैसर्गिक साधने महत्त्वाची असायची. बाजारहाट करण्यासाठी, एका गावाहून दुसऱ्या गावात जाण्यासाठी किंवा इतर कामांच्या निमित्ताने जाण्यासाठी साकवाचाच पुरेपूर उपयोग व्हायचा. साकव ही काही एकट्या दुकट्याने तयार होत नसे, तर ती समूहाच्या कष्टातून साकार होत असे. त्यासाठी विविध टिकाऊ झाडांच्या 'मेडीं' तयार केल्या जात असे. पाणी लागून मेडी ठिसूळ होता कामा नये याचीही दक्षता घेतली जात असे. बांबूची साटी करून तिचा वापर मोठ्या

P.T.O

खुबीने केला जायचा. मेडी, आडी, साटी यांना एकसंघ करून साकव तयार करण्यासाठी कणखर अशा राजवेलींचा वापर केला जायचा.

पाऊस सुरु होऊन तो धो धो कोसळायला लागला की बिनधास्तपणे नदीचे, ओहोळाचे पात्र ओलांडण्याची सवय कधी कधी घातक ठरायची. त्यावर उपाय म्हणून साकवाचा वापर व्हायला सुरवात झाली. साकव घालायचा झाला की संपूर्ण गाव एकत्रित व्हायचा. गावातील अनुभवी, जाणकार माणूस देवाला, जागेकराला नारळ, फुले वाहून गा-हाणे घालायचा, लोकमानसाचा उत्साह, जोम, तरतरी व समूहाने कार्य करण्याची वृत्ती यातून साकव घालण्याचे कष्टप्रद कार्य लीलया पार पाडले जायचे.

प्रश्न:

i) लोकजीवनातून प्रतिबिंबित होणाऱ्या सामग्रीची नावे लिहा. (२)

ii) साकवला जोडणारा दुवा का म्हटले आहे ? (२)

iii) साकवाचाच पुरेपूर उपयोग कधी व्हायचा ? (२)

iv) गावातील लोक एकत्रित आल्यावर काय करायचे ? (२)

v) वाक्य बनवा - पाऊस , गाव (२)

<u>व्याकरण - विभाग</u>

प्रश्न ४ ] खालील दिलेल्या निर्देशानुसार उत्तरे लिहा :- (८)

i) समानार्थी शब्द लिहा- अवघा

a) सग्ळा b) सगळा c) सगला d) सग्ला

ii) समानार्थी शब्द लिहा- तीर

a) किनार b) किनरा c) कीनारा d) किनारा

iii) विरुद्धार्थी शब्द लिहा- स्वातंत्र्य

a) गुरुमी b) गुलामि c) गुलामी d) गुलमी

iv) विरुद्धार्थी शब्द लिहा- कंटाळा

a) उत्साह b) ऊत्साह c) उत्साहः d) उत्साहं

v) लिंग ओळखा- श्रीमती

a) पुल्लिंग b) स्त्रीलिंग c) नपुंसकलिंग

vi) लिंग बदला - पुस्तक

a) पूस्तिक    b) पूस्तिका    c) पुस्तीका    d) पुस्तिका

vii) वचन ओळखा - झेंडे

a) एकवचन    b)अनेकवचन

viii) वचन बदला - नोकरी

a) नोकऱ्य    b) नोकऱ्या    c) नोकर्या    d)नोकऱया

ix) रेखांकित विकारी शब्दाचा प्रकार लिहा : - (३)

i) झाडांवरची पालवी <u>नवी</u> दिसत होती.

ii) गुरुजींनी भीमरावच्या डोक्यावरून हात <u>फिरवला</u>.

iii) दादा धावपटू आहे <u>तो</u> रोज पाळतो.

x) खालील वाक्यांत योग्य विरामचिन्हे वापरून ती वाक्ये पुन्हा लिहा :- (२)

i) त्यासाठी काय केले पाहिजे

ii) बस थांबलेली होती परंतु आत पाय ठेवायला जागा नव्हती.

## विभाग - ब

## साहित्य - विभाग (अंक -४०)

## गद्य - विभाग

प्रश्न ५] अ) खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा :- (१२)

i) पोटोबाबद्दल तक्रार सांगून सर्व इंद्रियांनी ती तक्रार करण्याचे कारणे स्पष्ट करा.

ii) लेखकाने सांगितलेले व्यायामाचे महत्त्व तुमच्या शब्दांत लिहा.

iii) 'आपण सगळे शरीररूपी राज्याचे सेवक आहोत' या विधानाबाबत तुमचे मत लिहा .

iv) लेखकाने शाळेच्या बागेत मनसोक्त केलेली मजा सांगा व लेखकाने सुचवलेले सुट्टीतील मजेशीर अनुभव तुमच्या शब्दांत लिहा.

आ) खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा :- (४)

i) लेखक कोणाकडून शिकले ?

ii) जिव्हाताई गप्प का होत्या ?

iii) हस्तकराजांनी कोणता निश्चय केला होता ?

iv) शाळेची वैशिष्टये लिहा ?

P.T.O

इ) खालील रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा:- (३)

i) आज बघ मी तुझ्या आवडीचे ...................... आणले आहेत.

ii) आपण सारे शरीररूपी राज्याचे ................... आहोत.

iii) सांगली हे ................ तले एक गाव आहे.

ई) कोण-कोणास म्हणाले ते लिहा:- (३)

i) 'किती दुष्ट असतात ही मोठी माणसं.'

ii) 'कोण झाडं लावत नाहीत ?'

iii) "आज स्वारी कशी आली इकडे?"

उ) शब्दार्थ लिहा:- बेअदबी , गिरीस्थान , कुरकुर करणे (३)

## <u>पद्य विभाग</u>

प्रश्न ६ ] अ) पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा:- (६)

i)संतांच्या सहवासात राहून मिळणाऱ्या आनंदाचे वर्णन संत चोखामेळा यांनी कसे केले आहे ?

ii) सानुल्या झुळकेच्या इच्छा कोणत्या तसेच सानुल्या झुळकेची लोकोपयोगी कामे सांगा.

आ) एका शब्दात लिहा :- (२)

i) शेताचा रंग -

ii) मखमली कोण -

इ) कवितेच्या ओळी पूर्ण करा :- (४)

गाण्याची ---------------------------------------------
---------------------------------------------------------
---------------------------------------------------------
--------------------------------------------------------- गात

ई) शब्दार्थ लिहा:- टाकळी , खर , अंगुली (३)

समाप्त